महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

पारेषण विभाग, प्रकाशगंगा, फ्लॅट नं. सी-१९, "ई" ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुलन,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
वेबसाइट: www.mahatransco. in

## जाहिर सूचना

**विषय** :- महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या आर्थिक वर्ष २००६-२००७ करिता एकूण वार्षिक महसूलाच्या गरजेबाबत अभिप्राय व सूचना

१. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (पारेषण कंपनी) यांनी आर्थिक वर्ष २००६-२००७ मधील एकूण महसूलाची आवश्यकता आणि वीज दर निर्धारण यासाठी मंजूरी मिळावी. म्हणून विद्युत कायदा २००३ अन्वये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) यांच्याकडे याचिका दाखल केली आहे. सदर याचिका आयोगाने दि. २२ मे २००६ रोजी दाखल करुन घेतली आणि पारेषण कंपनीस अधिनियमाप्रमाणे कलम ६४ (२) अन्वये जाहिर सूचना प्रकाशित करण्यास आदेश दिले आहेत.

२. पारेषण कंपनीने राज्याचा पारेषण उपक्रम या अधिकारात वार्षिक महसूली आवश्यकता आणि वीज दर याचिका दाखल केली आहे. तथापि, सदर याचिकेत राज्यभार प्रेषण केंद्राचा खर्च व आकार यांचा समावेश केलेला नाही. कंपनीने भार प्रेषण केंद्राच्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव स्वतंत्रपणे दाखल केलेला आहे व आयोगाने त्यांच्या दि. १६.०५.२००६ च्या आदेशानुसार (प्रकरण क्र. ३०/२००५) मंजूरी दिलेली आहे.(आदेश पाहण्यासाठी खालील वेबलिंक पहावी)
http://www.mercindia.org.in/pdf/22_Order_dt_16_05_2006_CN_30%20of%202005.pdf

३. पारेषण कंपनीकडे महाराष्ट्र राज्यात खालील प्रमाणे पारेषण जाळे आहे. पारेषण कंपनीच्या एचव्हीएसी व एचव्हीडीसी जाळयाची आर्थिक वर्ष २००५-२००६ करिता उपलब्धता अनुक्रमे ९८.७२% व ६३.४८% या मर्यादेत आहे.

| अ.क्र. | तपशील | अ.उ.दा. उपकेंद्रे (संख्या) | परिवर्तन क्षमता (एमव्हीए) | अ.उ.दा. वाहिनी (सर्कीट कि.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | ५०० के.व्ही. एचव्हीडीसी | २ | ३५८२ | १५०४ |
| २ | ४०० के.व्ही. | १७ | १२०३५ | ६३७६ |
| ३ | २२० के.व्ही. | १२३ | २३११७ | ११५१३ |
| ४ | १३२ के.व्ही. | २२२ | १२८४५ | १०१३२ |
| ५ | ११० के.व्ही. | ३२ | १७३१ | १६३७ |
| ६ | १०० के.व्ही. | २१ | १७३० | ६७८ |
| ७ | ६६ के.व्ही. | ५१ | ११२४ | ३२६८ |
| | **एकूण** | **४६८** | **५६१६४** | **३५१०८** |

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

४. याचिकेतील ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

**पारेषण कंपनीच्या वार्षिक महसूली गरजेचा सारांश :**

| | तपशील | युनिट | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|---|
| क | एकूण विद्युत ऊर्जा | द.ल.यु. | ६७१७३ | ६९७३१ | ७८४५६ |
| ख | पारेषण हानी | % | ६.०१% | ६.००% | ६.००% |
| ग | पारेषण कंपनीने पारेषित केलेली निव्वळ विद्युत ऊर्जा | द.ल.यु. | ६३१३६ | ६५५४७ | ७३७४९ |
| घ | भांडवली गुंतवणूक/खर्च | रु. कोटीत | २९७.१३ | २२७.०७ | १०५४.०० |
| च | वर्षभरातील भांडवली खर्च | रु. कोटीत | २६२.०९ | १३०.४२ | ७४७.१९ |
| छ | एकूण खर्च (वार्षिक महसूली गरजेचा घटक) | रु. कोटीत | १३७३.६२ | १४६९.७७ | १५०६.५२ |
| ज | आधिक्य/परतावा | रु. कोटीत | २१५.९३ | २०६.२४ | ३५४.३५ |
| झ | वीज दराखेरीजचे उत्पन्न | रु. कोटीत | ०.०० | ७.६० | ६.५२ |
| ट | अन्य व्यवसायातून उत्पन्न | रु. कोटीत | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **ठ** | **एकूण महसूलाची गरज (छ +ज - झ - ट )** | **रु. कोटीत** | **१५८९.५५** | **१६६८.४१** | **१८५४.३६** |

**पारेषण कंपनीच्या खर्चाचे विवरण**

रू. कोटीत

| अ.क्र. | तपशील | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|
| १ | संचालन व सुव्यवस्था खर्च | ३५६.५७ | ४१०.१३ | ४६७.०८ |
| | कर्मचारी खर्च | २४५.८३ | २६४.२८ | २९७.१३ |
| | प्रशासनिक व सर्वसाधारण खर्च | ३९.६५ | ४०.९९ | ४३.०३ |
| | दुरुस्ती व देखभाल खर्च | ७१.०८ | १०४.८६ | १२६.९२ |
| २ | घसारा(त्यासाठीच्या अग्रिमासहित) | ४७७.३० | ४९१.७८ | ४६५.०७ |
| ३ | दिर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ४८४.८१ | ४२९.०१ | ४२८.५६ |
| ४ | कार्यकारी भांडवलावरील व्याज धरुन इतर व्याज व वित्त आकार | ५४.९४ | ५६.५० | ६०.१५ |
| ५ | इतर खर्च ( विनियम दरातील चढउतारामुळे झालेले नुकसान) | | -०.२८ | १.४१ |
| ६ | आयकर | | ४१.०१ | ४१.९९ |
| ७ | आकस्मित खर्चासाठी राखीव निधीस अंशदान | | ४१.६१ | ४२.२६ |
| | **एकूण खर्च** | **१३७३.६२** | **१४६९.७७** | **१५०६.५२** |

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

## आर्थिक वर्ष २००६-२००७ करिता पारेषण कंपनीचा विद्युत दर प्रस्ताव

पारेषण कंपनीने पारेषण दरासाठी कोणताही प्रस्ताव दिलेला नाही. तथापि, पारेषण दर तत्वासंबंधी आयोगाने चर्चेसाठी प्रसारित केलेल्या टिप्पणीवर पारेषण कंपनीने अभिप्राय दाखल केलेले आहेत. त्या अनुषंगाने राज्यातील इतर परवानाधारकांच्या पारेषण व्यवसायाची वार्षिक महसूली गरज लक्षात घेऊन संपूर्ण राज्याकरिता पारेषण वीज दर निर्धारित करण्याचा प्रस्ताव आहे.

महसूल

पारेषण कंपनीने मिळविलेला महसूल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | २००४-०५ | २००५-०६ | २००६-०७ |
|---|---|---|---|---|
| १ | पारेषण दर ( पैसे/कि.वॅ. तास) | लागू नाही @ | २६.० * | $ |
| २ | पारेषित केलेली वीज (दल.यु.) | ६३१३६ | ५५७४८ | ७३७४९ |
| ३ | महसूल प्राप्ती (रु. कोटीत) | लागू नाही | १४११.३० | १८५४.४४ $$ |

**टिप -**

(क) @ - पारेषण कंपनी तात्पुरत्या हस्तांतरण योजनेतून दि. ०५ जून २००५ पासून अस्तित्वात आली. त्यामुळे आर्थिक वर्ष २००४-२००५ आणि २००५-२००६ , ०५ जून २००५ पर्यंत पारेषणबाबतीत वीज दर आणि महसूल प्राप्ती स्वतंत्रपणे नाही.

(ख) * - महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ऑक्टोबर २००५ पर्यंत २४.५ पैसे/कि.वॅ. तास आणि त्यानंतर २६.०० पैसे/कि.वॅ. तास, तदर्थ पारेषण आकार म्हणून देत आहे.

(ग) $ - चर्चात्मक टिप्पणीतील पारेषण किंमतीच्या तत्वांच्या आधारे आयोगाने पारेषण दर निर्धारित करुन द्यावयाचे आहेत.

(घ) $$ - आयोगाने वार्षिक महसूली गरजेएवढा महसूल मिळेल अशा रितीने दर निर्धारित करुन द्यावयाचा असल्याने एकूण महसूल, वार्षिक महसूली गरजेएवढा असेल, असे गृहित धरले आहे.

५. खालील कागदपत्रांच्या प्रती, लेखी विनंती केली असता पारेषण कंपनीच्या खालील कार्यालयात मिळतील.

(क) प्रस्तावाचा कार्यकारी सारांश (विना शुल्क, मराठी किंवा इंग्रजी)

(ख) याचिकेच्या तपशीलाची प्रत (सीडीसहित - इंग्रजीमध्ये) **महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड** यांच्या नावे १५०/- रुपयांचा भरणा डीमांड ड्राफ्ट/चेक/नगदी रक्कम याद्वारे केल्यानंतर मिळू शकेल.

(ग) याचिकेचा तपशीलाची प्रत (इंग्रजीमध्ये) **महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड** यांच्या नावे १००/- रुपयांचा भरणा डीमांड ड्राफ्ट/चेक/नगदी रक्कम याद्वारे केल्यानंतर मिळू शकेल.

(घ)याचिकेचा तपशील (इंग्रजीमध्ये केवळ सी.डी.) महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनी **लिमिटेड** यांच्या नावे ५०/- रुपयांचा भरणा डीमांड ड्राफ्ट/चेक/नगदी रक्कम याद्वारे केल्यानंतर मिळू शकेल.

**मुख्य कार्यालय**

**कार्यकारी अभियंता (वीज दर नियामक कक्ष)**
४ था मजला, प्रकाशगंगा,
फ्लॅाट नं. सी-१९, "ई" ब्लॉक,
बांद्रा-कुर्ला संकुलन,
बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
कार्यालय : २६५९ ५११३/२६५९ ५१४४
फॅक्स : ०२२ - २६५९ ८५८७
ई-मेल : secp@mahatransco.in

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

**इतर कार्यालये**

**१) मुख्य अभियंता, पारेषण (सं व सु)परिमंडल औरंगाबाद**
जुने पॉवर हाऊस, मिल कॉर्नर जवळ,
डॉ. आंबेडकर रस्ता, औरंगाबाद ४३१ ००१
कार्यालय : २३४६२८८/२३४६५८९
फॅक्स : २३४६२९०
ई-मेल : ceabd@mahatransco.in

**२)मुख्य अभियंता ,पारेषण (सं व सु) परिमंडल, कराड**
विजय नगर, पो. सुपाने, ता. कराड,
जि. सातारा ४१५११४
कार्यालय : २५५१११६
फॅक्स : २५५१५१
ई-मेल : cekarad@mahatransco.in

**३) मुख्य अभियंता पारेषण सं व सु परिमंडल, कळवा**
प्रशासकीय इमारत, फ्लॉट नं.५, सेक्टर १७,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३
कार्यालय : २७६६५९९४/२७६६५९८४
फॅक्स : २७६६२०५५
ई-मेल : cekalawa@mahatransco.in

**४) मुख्य अभियंता पारेषण सं व सु परिमंडल, नाशिक**
विद्युत भवन, ३ रा मजला, नाशिक-पुणे रोड
बिटको चौक, नाशिक रोड-४२२ १०१
कार्यालय : २४६३९२७
फॅक्स : २४६२४२२
ई-मेल : cenasik@mahatransco.in

**५) मुख्य अभियंता पारेषण सं व सु परिमंडल, नागपूर**
विद्युत भवन, काटोल रोड चौक,
नागपूर - ४४० ०१३
कार्यालय : २५८५३१६
फॅक्स : २५९१२५३
ई-मेल : cenagpur@mahatransco.in

६. आयोगाने या जाहिर सूचनेद्वारे पारेषण कंपनीच्या उक्त याचिकेवर जनतेचे अभिप्राय व सूचना मागवाव्यात, असे आदेश दिले आहेत. अभिप्राय व सूचना यांची प्रत संचालक (संचालन), महापारेषण, वीज दर नियामक कक्ष, प्रकाशगंगा,फ्लॅाट नं. सी-१९, "ई" ब्लॅाक,बांद्रा-कुर्ला संकुलन,बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ यांना एक प्रत पाठविल्याच्या पुराव्यासह सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, वर्ल्ड ट्रेंड सेंटर, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई- ४०० ००५ (फॅक्स नं. ०२२-२२१६३९७६, ई मेल - mercindia@mercindia.org.in) यांना दि. ९ जून २००६ पूर्वी पाठविण्यात यावी.

७. आक्षेप/सूचना/अभिप्राय जाहिर सूचनेच्या प्रसारणानंतर तीन आठवडयांच्या आत दि.९ जून २००६ पूर्वी इंग्रजी अगर मराठी भाषेत एकूण ६ प्रती पाठवाव्यात. त्यावर प्रेषकाचे नाव, पोस्टाचा पत्ता व ई-मेल पत्ता तसेच ही हरकत एखादया श्रेणीतील ग्राहकांच्या संघामार्फत घेतली जाते किंवा काय याचा उल्लेख करावा. सूचना प्रेषकास त्याचे म्हणणे आयोगाच्या सेंट्रल हॅाल, १ ला मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर नं.१, कफ परेड, मुंबई ठिकाणी मंगळवार, दि. १३ जून २००६ या तारखेला १५:०० वाजता होणा-या जाहिर सुनावणीच्या वेळी प्रत्यक्षात ऐकवावयाची असल्यास तसा उल्लेख करावा, त्यासाठी वेगळी सूचना दिली जाणार नाही.

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com

८. पारेषण कंपनीने दि. ९ जून २००६ पूर्वी मिळालेल्या प्रत्येक आक्षेपास/सूचनांस/अभिप्रायास प्राप्त झाल्यापासून एका आठवडयात (१२ जून २००६ तत्पूर्वी) उत्तर द्यावयाचे आहे. कंपनीच्या उत्तरावर ते प्राप्त झाल्यापाासून एका आठवडयात (१८ जून २००६ तत्पूर्वी) आक्षेपक प्रत्युत्तर देऊ शकेल. दोन्हीं बाबतीत आयोगास सहा प्रती पृष्ठांकित करण्यात याव्यात.

९. सुधारित याचिकेचे दस्तऐवज संपूर्ण माहितीचे नमुने (Formats) आणि कार्यकारी सारांश पारेषण कंपनीच्या बेबसाईटवर (http://www. mahatransco.in) उपलब्ध आहे. कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) आयोगाच्या वेबसाईवरुन (http://www.mercindia.org.in) विनामूल्य उपलब्ध करता येऊ शकेल.

**सही**
**(श्री. अ.द. पालमवार)**
**संचालक (संचालन)**
**म.रा.वि.पारेषण कं.मर्या.**

Created by Neevia Personal Converter trial version http://www.neevia.com